# केंद्रपुरस्कृत नदी खोरे प्रकल्प

## प्रस्तावना :

नदी खोरे म्हणजे एखादे नदीचे पाणलोटांचे क्षेत्र अशा नदीखो-यामध्ये त्या नदीला येवून मिळणा-या सर्व उपनदया, नाले, लहान लहान ओढे, इ . ज्या जलप्रवांहाचे पाणी त्या नदीत एकत्र होते , अशा सर्व लहान मोठया पाणलोट क्षेत्राचा समावेश होतो .अशा सर्व नदीखोरेचे सर्व्हेक्षण करुन सर्व लहान मोठया नदयाचे पाणलोट क्षेत्र सिमांकित करण्यात आले आहेत.

काही सिंचन प्रकल्पांचा अभ्यास केला असता असे दृष्टोत्पतीस आले आहे की, त्या प्रकल्पाच्या जलाशयाची साठवण क्षमता दिवसेंदिवस वेगाने कमी होत आहे .याच्या कारणांचा मागोवा घेतला असता असे दिसून येते की, या नदयाच्या पाणलोट क्षेत्रातील जमिनीची मोठया प्रमाणावर धूप होवुन त्या धुपीमुळे खोऱ्यातील जमिनीच्या पृष्ठभागावरील माती, पालापाचोळा, दगडगोटे इ. जलप्रवाहाबरोबर वाहत येवून ती सर्व गाळाच्या स्वरुपात धरणाच्या जलाशयात साठतात आणि त्यामुळे जलाशय उथळ होवून त्याची पाणी साठवण्याची क्षमता दिवसेंदिवस कमी होत जाते.

नदीखोरेच्या पाणलोट क्षेत्रामध्ये मृद व जलसंधारणाचे उपचार केले नसल्यामुळे जमिनीच्या धुपेमुळे जलप्रवाह, ओढे नाले, इत्यादीतुन गाळ वाहत येऊन तो नदीच्या जलाशयात साठतो. यास प्रतिबंध करण्यासाठी पाणलोट क्षेत्रामध्ये मृदसंधारणाचे उपचार घेण्याची आवश्यकता आहे. पाणलोट क्षेत्रावर उपचार नसल्यामुळे पावसाचे पडणारे संपूर्ण पाणी ओढे नाल्यातून नदीस येऊन मिळते त्यामुळे पूर/महापूर इत्यादी समस्या उदभवून पिकांची नासाडी व घराची वाताहत होते, आरोग्य बिघडते, रोंगांचा प्रादुर्भाव होतो, दळणवळण विस्क्ळीत होऊन एकूणच जनजीवन विस्कळीत होते. अनिर्बंध धुपेमुळे जमिनीची उत्पादन क्षमता कमी होऊन अन्नधान्य व इतर पिकांचे उत्पादन व उत्पादकता कमी कमी होत जाते. धुपेमुळे वनस्पतीच्या वाढीवर विपरीत परिणाम झाल्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला जातो. या बाबी टाळण्यासाठी राज्यात कृषि विभागामार्फत सन 1993-94 पासून नदीखोरे प्रकल्प योजना ही 100 टक्के केंद्राच्या अर्थसहाय्यातून राबवण्यात येत आहे.

## उददेशः-

1. नदीखोरे प्रकल्पाच्या जलग्रहण क्षेत्रामध्ये विविध उपचार राबवुन जमिनीचा -हास थांबविणे.
2. पाणलोट क्षेत्रामध्ये जमिनीचा ओलावा टिकविण्याची क्षमता व उत्पादकता वाढविणे.
3. क्षमतेनुसार जमिनीचा वापर करणे.
4. मोठया पाटबंधारे प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात विविध उपचार करुन जलाशयात येणा-या गाळाचे प्रमाण कमी करणे.
5. पाणलोट क्षेत्र विकासामध्ये लोकसहभाग वाढविणे.

..2

## योजनेची व्याप्ती :-

नदी खोरे योजना दमणगंगा, उकाई, ,सरदार सरोवर , नागार्जूनसागर व पोचमपाड या प्रकल्पातील खोऱ्यामध्ये कृषि विभागामार्फत सन 1993-94 पासून राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत सन 2010-11 मध्ये कार्यान्वित केलेल्या पाणलोटांचे विकासासाठी सन 2014-15 मध्ये सोलापूर,अहमदनगर, औरंगाबाद, बीड, जालना, सातारा, व सांगली या जिल्हयामध्ये ही योजना कार्यान्वित आहे.

केंद्र पुरस्कृत नदी खोरे प्रकल्प योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडील Operational Guidelines जूलै-2008 नूसार कार्यान्वीत पाणलोटासाठी या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

## 1. प्रकल्पाचे घटक

| अ.क्र. | घटकाचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|
| अ) | **क्षेत्रिय कामे** | |
| | 1. सर्व्हे, सिमांकन करणे व पाणलोट प्रकल्प अहवाल तयार करणे. | 2.00 |
| | 2. प्रेरक प्रवेश उपक्रम व पाणलोट समितीची स्थापना करणे. | 2.00 |
| | 3. नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन | 62.00 |
| | 4. शेती उत्पादन पध्दती व सुक्ष्म उद्योजकता<br>अ) शेतकरी कुटूंबाकरीता<br>ब) भूमिहीन / मत्ता नसणाऱ्या व स्वयंसहाय्यता गटाकरीता | <br>5.00<br>3.00 |
| | 5. कॉपर्स फंड | 2.00 |
| | **एकूण** | 76.00 |
| ब | **प्रशासकीय खर्च** | |
| | 1. वेतन व भत्ते | 15.00 |
| | 2. आकस्मिक खर्च | 3.00 |
| | 3. हैड्रॉलॉजिक व गाळ सनियंत्रण | 2.00 |
| | 4. स्टोअर, लॅब व कॅंप बांधणे | 1.00 |
| | 5. तंत्रज्ञान प्रसार (संस्थानी क्षमता बांधणी, प्रशिक्षण / कार्यशाळेचे आयोजन करणे, पिक प्रात्यक्षिके क्षेत्रिय भेटीचे आयोजन, प्रकाशने, स्वयंसेवी संस्था सेवा, सनियंत्रण व मुल्यमापन) | 3.00 |
| | **एकूण** | 24.00 |
| | **एकूण सर्व** | 100.00 |

केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.4-12012/NRM-i, Dated: 10/07/2012 चे पत्रानूसार नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन या घटकावर या चालू वित्तीय वर्षामध्ये खर्च करावयाचा आहे.

## 2) **संस्थात्मक रचना :**

राज्यस्तरावर सदरचा पाणलोट विकास कार्यक्रम राबविणेसाठी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा कार्यक्रमाची अंमलबजावणी व समन्वय करेल. तसेच, राज्यामध्ये प्रकल्पाची संपूर्ण अंमलबजावणी व सनियंत्रण राखण्याची जबाबदारी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेची असेल. जिल्हास्तरावर सदरचा पाणलोट विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण जिल्हा पाणलोट विकास युनिटची असेल. तालूका स्तरावर तालूका प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा, पाणलोट विकास पथक व गांवस्तरावर स्वयंसहाय्यता गट, उपभोक्ता गट आणि पाणलोट समिती अशी संस्थात्मक रचना आहे.

## 3) **पाणलोट विकास पथक :**

पाणलोट विकास पथक हा प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाचा अविभाज्य भाग असून तो प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणेकडून स्थापन केला जाईल. प्रत्येक पाणलोट विकास पथकामध्ये कमीत कमी 4 सदस्य असतील, त्यांना कृषि, मृदविज्ञान, जल व्यवस्थापन, सामाजिक बांधीलकी व क्षमता बंाधणी यामधील ज्ञान व अनुभव असेल. पाणलोट विकास पथकाच्या सदस्यांपैकी निदान एक सदस्य, महिला सदस्य असावी. पाणलोट विकास पथकाचे सदस्य हे व्यावसायिक पदवी धारण करणारे असावेत.

पाणलोट विकास पथकामध्ये खालीलप्रमाणे सदस्यांची नियुक्ती करावी.

1. कृषि /वन विषय -सदस्य क्र. 1
2. कृषि / वन विषय - सदस्य क्र. 2
3. समाज कार्य,
4. संस्थात्मक बांधणी / पशुसंवर्धन या विषयातील सदस्यांचा समावेश असेल.

पाणलोट विकास पथक सदस्याच्या कार्य व जबाबदाऱ्या नदी खोरे प्रकल्पाच्या केंद्र शासनाच्या कार्यान्वयन मार्गदर्शक सूचना मुद्दा क्र. 15 नुसार राहतील.

## 4) **पाणलोट समिती :**

ग्रामसभा, गावामध्ये पाणलोट विकास पथकाच्या समन्वयाने व प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यानी तयार केलेल्या पाणलोट प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) नुसार अंमलबजावणी करण्यासाठी, पाणलोट समितीची (WC) स्थापना करेल. संस्था नोंदणी अधिनियम 1860 नुसार पाणलोट समितीची (WC) नोंदणी करणे अनिवार्य राहील. ग्रामसभा, पाणलोट समितीचा अध्यक्ष म्हणून गावातील कोणत्याही योग्य व्यक्तीची निवड करेल/नियुक्ती करेल. पाणलोट समिती कमीतकमी 11 सदस्यांची मिळून बनलेली असेल, त्यातील अधेर् सदस्य स्वयंसहाय्यता गट व उपभोक्ता गट, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती समूह, स्त्रिया, गावातील भूमिहीन व्यक्ती यांचे प्रतिनिधी असतील. पाणलोट विकास पथकाचा एक सदस्य सुध्दा पाणलोट समितीमध्ये प्रतिनिधित्व करेल.

शासन निर्णय क्र एपाव्य 2012/प्र.क्र104/जल-8 दिनांक 18 एप्रिल,2013 अन्वये दि.27 सप्टेंबर 2012 पुर्वी ज्या ग्रामपंचायतीमध्ये पाणलोट समित्या ग्रामसभेव्दारे निवड व नियुक्त झाल्या होत्या त्या पूर्वीप्रमाणेच अस्तित्वात राहतील व पुढेही काम पाहतील. पाणलोट समीतीची रचना पुर्वीप्रमाणेच राहिल. तसेच यापुढे सामायिक मार्गदर्शक सूचना 2008 सुधारित आवृत्ती 2011 परि.6.3 मध्ये नमूद तरतूदीनुसार पाणलोट समित्या निवड व नियुक्त करण्याचे अधिकार ग्रामसभेलाच राहतील असे सुचित करण्यात आले आहे.

### पाणलोट समितीची रचना खालील प्रमाणे राहील: (WC)

1. पाणलोट समिती अध्यक्ष - ग्राम सभेने ठरविलेला
2. उपभोक्ता गटाचे सदस्य - 3 सदस्य ( महिला सदस्य – किमान -1 )
3. स्वयंसहाय्य गटाचे सदस्य - 3 सदस्य ( महिला सदस्य – किमान -1 )
4. अनु.जाती/अनु.जमाती समुह – 1 सदस्य
5. पाणलोट विकास पथक सदस्य – प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेकडील क्षेत्रीय पातळीवरील कर्मचारी.
6. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेचा क्षेत्रिय स्तरावरील कर्मचारी - सदस्य (उदा. कृषि विभागाचा कृषि सहाय्यक, वन विभागाचा त्यांनी नेमलेला कर्मचारी सदस्य म्हणून काम करेल.)
7. पाणलोट समितीचा सचिव - ग्राम सभेने ठरविलेला.

4.1 **पाणलोट समितीची कार्ये :**

पाणलोट समितीची कार्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे असतील.

4.2 **पाणलोट समिती सचिवाची कार्ये :**

पाणलोट समितीची कार्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे असतील.

4.3 पाणलोट प्रकल्पाकरिता निधी मिळविण्यासाठी पाणलोट समिती (WC) राष्ट्रीकृत बँकेत एक स्वतंत्र खाते उघडेल. सदरचे बॅक खाते हे पाणलोट समितीचा अध्यक्ष, पाणलोट विकास पथकाचा एक सदस्य व पाणलोट समितीचा सचिव यांचे संयुक्त नावे असेल. पाणलोट समिती सदरचे खाते प्रकल्पातील कामे करणेकरीता वापरेल. पाणलोट समितीच्या वतीने सचिव व पाणलोट विकास पथक नामनिर्देशित सदस्य हे धनादेशावर **संयुक्त स्वाक्षरी** करतील.

**प्रकल्पाची शाश्वता :**

पाणलोट समितीचा सचिव, पाणलोट विकास निधीच्या (Corpus Fund) जमा खर्चाचा पूर्णपणे स्वतंत्र लेखा ठेवेल. असा निधी हाताळण्यासाठी पाणलोट समिती (WC) एक नियमावली तयार करील व त्यास WDT मान्यता घेईल. पाणलोट क्षेत्र विकास निधीचे (WDF) बॅक खाते ग्रामपंचायत अध्यक्ष (सरंपच) व ग्रामसभेने नामनिर्देशित केलेला स्वयंसहायता गटाचा कोणताही सदस्य यांनी हाताळावे. सदरचा निधीचा उपयोग नैसर्गिक साधन संपत्ती अंतर्गत निर्माण झालेल्या उपचारांचा देखभालीसाठी वापरणेत यावा. यासाठी योजनेत 2 टक्के निधीची तरतुद करणेत आलेली आहे.

## 5 देयक अदा करण्याची पध्दत –

शासन निर्णय क्र. जलस-2008/प्र.क्र.161/जल-7, दि. 10 आक्टोबर 2010 अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनानूसार प्रत्येक पाणलोटात पाणलोट समितीमार्फत करण्यात येणा-या कामाची देयके संबंधीत शेतकरी, मजुर, फुटकळ ठेकेदार व मशिनधारक यंत्रणा इत्यादींना बॅकामार्फत रेखांकीत धनादेशाद्वारे ( क्रॉस चेकद्वारे ) अदा करण्यात यावीत.

## 6 सनियंत्रण व मूल्यमापन :

योजनेची पाणलोटनिहाय अंमलबजावणी करताना सनियंत्रण ही एक अतिशय महत्वाची बाब आहे. यासाठी जिल्हास्तरावर एक दक्षता पथकाची स्थापना करणेसाठी यापुर्वीच सुचना दिलेल्या आहेत. झालेल्या कामांची तपासणी विहीत पध्दतीने होणेसाठी संबधित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा, उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांनी इतर पाणलोट विषयक योजनांमध्ये निर्धारित केलेल्या टक्केवारीनुसार कामाची तपासणी करावी. तपासणीमध्ये कामांना भेटी, लाभार्थी भेटी, नोंदवहया तपासणी, आर्थिक, प्रशासकीय व तांत्रिक बाबींची तपासणी, योजनेचा वेळोवेळी आढावा घेणे, मासिक व त्रैमासिक अहवाल सादरीकरण इ.बाबी अंतर्भूत असाव्यात. पाणलोटनिहाय, जिल्हानिहाय संकलीत अहवाल विभागाने एकत्रित करून मासिक व त्रैमासिक अहवाल विहीत नमुन्यात व विहीत वेळेत आयुक्तालयास सादर करावा.

## 7. अहवाल सादरीकरण :

केंद्र शासनाने ठरवून दिलेले अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांनी जिल्हानिहाय मासिक प्रगती अहवाल पाणलोट निहाय / बाबनिहाय भौतिक व आर्थिक स्वरूपात तसेच मुख्य बाबींचा समावेश असलेला 1 पानी अहवाल दरमहा आयुक्तालयास 5 तारखेपर्यंत सादर करावयाचा आहे. तसेच, झालेल्या खर्चाचे आवश्यकतेनूसार विहीत प्रपत्रातील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

**टिपणी**

जा.क्र./मृदस/मा.सु./मृद-2/      /2014
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-411001, दि.      /06/2014

**विषय :- कृषि विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजनांच्या सन** 2014-15 **च्या मार्गदर्शक सुचनांबाबत.....**

**संदर्भ :-** टिपणी क्र. आकृकक्ष/मा सु/2014/289, दि. 29.05.2014.

उपरोक्त संदर्भांकित विषयानूसार या कार्यासनात कार्यान्वीत असलेल्या

1. केंद्र पुरस्कृत नदी खोरे प्रकल्प योजना.
2. नाबार्ड अर्थसहाय्यीत ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत पाणलोट विकास कार्यक्रम (आर.आय.डी.एफ.)
3. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाचे पायाभूत प्रशिक्षण.

या योजनांच्या मार्गदर्शक सुचना यांची अद्यावत माहिती mahaagri.gov.in या संकेतस्थळावर **upload** करण्यासाठी हार्ड व सॉफ्ट कॉपीमध्ये सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

सोबत :-वरीलप्रमाणे
स्थळप्रतीवर संचालक (मृ.सं.)
यांची स्वाक्षरी असे

**संचालक**
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001.

प्रति,

**कृषि उपसंचालक (संगणक प्रकल्प)**
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-411001.

प्रत:- कृषि उपसंचालक (आयुक्त कृषि कक्ष) यांना माहितीस्तव.